Nature of work – Assisting senior citizens

Police Station and District – Kothari police station, Dist- Chandrapur, M.S.

Date of good work done – 08 October 2019

Brief of the work done- **The man in Khaki Uniform always rushes to help**

## खाकी वर्दीतला माणुस नेहमी मदतीला धावतो

कोठारी पोलीस ठाणेत दिनांक ८/१०/२०१९ रोजी धम्मचक्र रॅलीचे दरम्यान ठाणेदार सपोनि अंबिके यांना कवडजई गावातील इसम दुधबळे यांनी फोनद्वारे माहिती दिली की,कवडजई तलावाजवळ असलेल्या जंगलात नाल्यामध्ये एक वयोवृद्ध इसम पडलेला आहे बाबतची माहिती दिल्यावरून सपोनि अंबिके, पोलीस हवालदार तिवारी,गेडाम पोलीस शिपाई उपरे, डोंगरकर,कवलकर, वसीम व सारथी टीमच्या मपोशी जयश्री असे माहिती दिल्याप्रमाणे रवाना होऊन जंगल परिसरात सदर इसमाचा शोध घेतला असता एक वयोवृद्ध इसम विमनस्क अवस्थेत अंधारात पाण्यामध्ये निपचित पडलेला आढळून आला. त्याला ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात आणले.त्याला जेवण दिले त्याची वैद्यकीय तपासणी करून त्याची प्रकृती ठीक झाल्यानंतर त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव रामकुमार शर्मा वय ७० वर्ष राहणार कुम्हेरी असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे कुम्हेरी गाव नेटवर सर्च करून सदरचे गाव तालुका जोरा,जिल्हा मोरेना,राज्य मध्य प्रदेश येथे असल्याचे समजले. मोरेना नियंत्रण कक्षात फोन करून माहिती घेतली. नियंत्रण कक्षाकडून कुम्हेरी गाव बाकेणी पोलीस स्टेशन अंतर्गत येत असल्याने आम्ही बाकेणी पोलीस स्टेशनचा नंबर घेऊन तेथील ठाणेदार श्री.रणवीर सिंग यांचेशी संपर्क साधला. त्यांना वरील इसम मिळाल्या बाबतची माहिती दिली. त्यांनी त्यांचेकडे गुमसुदा नंबर १६/१९ अन्वये नोंद असल्याची माहिती दिली. त्याप्रमाणे बाकेनी पोलीस पथक कोठारी पोलीस ठाण्यात रवाना करीत असल्याबाबत माहिती दिली.कारवाईदरम्यान अधिकारी सपोनि अंबिके, पोउनि सोनवणे, पोलीस हवालदार तिवारी, गेडाम, पोलीस शिपाई उपरे, डोंगरकर, कवलकर, वसीम, सारथी टीमच्या मपोशी जयश्री यांनी अथक परीश्रम घेतले.





Nature of work – Recovery of Stolen Property.

Police Station and District – Police Station Ramnagar, Dist- Chandrapur, M.S.

Date of good work done – 04 October 2019

Brief of the work done- **मॉल मधुन चेक चोरी करुन सोन खरेदी करणारे आरोपी जेरबंद**

पोलीस स्टेशन रामनगर जिल्हा चंद्रपुर येथे एमडीआर मॉलचे मालक यांनी रिपोट दिली की, त्यांचे एसबीआय अॅकाउंटचे 05 चेक मॉल मधील त्यांचे कॅबीनमधुन कोणीतरी चोरी करुन त्यावर बनावट सही करुन त्या चेकव्दारे अमरावती येथुन 10,37,682 रुपये किमतीचे सोने खरेदी केले यावरुन पोलीस स्टेशन रामनगर येथे गुन्हां नोंद करण्यात आला.

सदर गुन्हा हा क्लिष्ट स्वरुपाचा असल्याने याचा तपास स्थानिक गुन्ह शाखेकडे देण्यात आला. तसेच पोलीस अधीक्षक यांनी सुध्दा सदर गुन्हयांचे तपासात वेळोवेळी पाठपुरावा व मागदशन केले. तपासादरम्यान केलेले तांत्रिक विश्लेषन व उपयुक्त माहीतीव्दारे सुरवातीस नागपुर येथुन आरोपी क्रमांक ०1 यास ताब्यात घेवुन विचारपुस केली , तर त्याने आरोपी क्रमांक 02 हा एमडीआर मॉल चंद्रपुर येथे मॅनेजर असुन तोच सुत्रधार असल्याचे सांगितले. तपास पथकाने लागलीच मॅनेजर यास चंद्रपुर येथुन ताब्यात घेवुन अंत्यत कौशल्यपुवक त्यास प्रश्न विचारले व अधिक चौकशी केली असता, आरोपी याने गुन्हयांची कबुली दिली. आतापयत केलेल्या तपासात हकीकत समोर आली आहे की, आरोपी हाएमडीआर मॉल चंद्रपुर येथे मॅनेजर म्हणुन काम करतो त्याने मागील पाच ते सहा महीन्यांपासुन फियादी व मॉलचे मालक यांचे हालचालीवर बारीक लक्ष ठेवुन माहीती घेतली , यादरम्यान त्याने नागपुर येथिल अन्य 02आरोपी यांचेशी संगणमत करुन गुन्हयांची योजना आखली. सदर आरोपी यांनी एमडीआर मॉलचे मालक यांचेच नावाने बनावट आधार काड तयार करुन त्या कागदपत्राचे आधारावर सिम काड खरेदी केले. दिनांक 08-08-२०19 रोजीचे पुवा आरोपी मॅनेजर याने मॉल मधुन एकुण 05 चेक चोरी करुन नागपुर येथील आरोपी यांना चेक व्दारे सोने खरेदी करण्याचे सांगीतले. त्यानुसार सव आरोपी यांनी अमरावती येथिल सराफा माकटमधुन एकुण 10,37,682 रुपयाचे सोने खरेदी केले व त्याची आपआपसात वाटणी केली.

आरोपीतांनी गून्हां करतांना पुरावा राहणार नाही याची दक्षता घेण्याचा प्रयत्न केला परंतु कायदयाच्या कचाटयातुन कोणताही गुन्हगार सुटु शकत नाही त्याप्रमाणे पोलीस पथकाने अतिशय बारकाईने तपास करत गुन्हयांचा छडा लावला व आरोपी यांनी दिलेल्या कबुलीनुसार त्यांनी खरेदी केलेल्या 25 तोळे सोन्यापैकी 22.5 तोळे सोने आणि 50,000 हजार रुपये रोख हस्तगत केले आहे. सदर गून्हयांमध्ये दिनांक 04-10-2019 रोजी एकुण चार आरोपीना अटक करण्यात आली आहे.

सदर गुन्हयांचा तपास पोलीस अधीक्षक, चंद्रपूर डॉ.महेश्वर रेड्डी यांचे मागदशनात, स्थानिक गुन्हे शाखा प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, सपोनि जितद्र बोबडे, पोउपनि विकास मुंढे, पोउनि सचिन गदादे, सफौ पदमाकर भोयर, पोहवा महद्र भुजाडे, पोहवा बघमारे, पोशि प्रशांत लारोकर, छगन जांभुळे, बल्की, झिलपे, कुंदन बावरी, नितीन, जावेद यांनी केला.



Nature of work – Recovery of missing children

P. S. and District – P.S. Rajura And P.S. Warora Dist- Chandrapur, M.S.

Date of good work done – 20 June 2019

Brief of the work done- Police success in locating two missing minors

दोन बेपत्ता अल्पवयीन मुलांना शोधण्यात पोलीसांना यश

फियादी नामे विलास देवाजी ईटनकर रा. गोवरी ता. राजुरा जिल्हा चंद्रपुर महाराष्ट्र यांनी पोलीस स्टेशन राजूरा येथे दिनांक 03/02/2019 रोजी तक्रार नोंदविली की , त्यांचा 14 वर्षाचा मुलगा बेपत्ता झाला आहे अशा रिपोट वरुन पोलीस स्टेशन राजुरा येथे अपराध क्रमांक 77/2019 कलम 363 भादंवि अन्वये गुन्हां दाखल करण्यात येवुन मुलाची शोध मोहीम पोलीसांनी सुरु केली. तब्बल चार महीन्यानंतर पोलीसांना मिळालेल्या तांत्रिक माहीतीच्या आधारे मौजाअकलुज जिल्हा सोलापुर येथे हा मुलगा असल्याची माहीती प्राप्त होताच तपास पथक सोलापुर येथे रवाना करुन सोलापुर पोलीसांच्या मदतीने विलास ईटनकर यांच्या मुलास शोधण्यात पोलीसांना यश आले. सदरची कामगीरी डॉ.महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक चंद्रपुर यांचे मागदशनात, राजुरा उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. शेखर देशमुख यांचे नेतृत्वात राजुरा पोलीस स्टेशन येथील तपास पथकाने पार पाडली.

त्याचप्रमाणे पोलीस स्टेशन वरोरा येथे दाखल अपराध क्रमांक 455/2019 कलम 363 भादंवि मधील बाबारात रामटेके यांचा 14 वर्षाचा मुलगा दोन महीन्यांपुर्वी वरोरा येथुन बेपत्ता झाला होता. या दरम्यान त्याचा आईवडीलांसोबत कोणताही संपक झाला नाही याप्रकरणातमध्ये डॉ. महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक चंद्रपुर मागदशनात सायबर सेल येथील पथकाने मुलाचा शोध घेवुन त्यास दिल्ली येथुन चंद्रपुर येथे परत आणण्याकरीता महत्त्वाची कामगीरी बजावली.

